महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

## सूचना

महाराष्ट्र ग्राहक संरक्षण व मार्गदर्शन निधी नियम, १९९२ मधील परिच्छेद ७ नुसार राज्य शासनाकडून सहाय्यक अनुदान वितरीत करण्यासाठी महाराष्ट्रात ग्राहक चळवळ व ग्राहक जनजागृती क्षेत्रात तसेच इतर क्षेत्रात काम करणाऱ्या, परंतु ग्राहक चळवळ, ग्राहक जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करुन ग्राहकांच्या हक्काचे संरक्षण व संवर्धनाचे कार्य करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

यासंदर्भात या विभागाच्या दि. २६ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयानुसार, ग्राहक जनजागृती क्षेत्रात काम करणाऱ्या ग्राहक संस्थांव्यतिरिक्त इतर क्षेत्रात काम करणाऱ्या परंतु ग्राहक चळवळीचेही कार्य करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांना शासनाकडून अनुदान वितरीत करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असून, सोबत अर्जाचा नमुनाही देण्यात आला आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. अर्ज करणाऱ्या इच्छुकांनी विहित नमुन्यातील त्यांचा प्रस्ताव जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कार्यालयीन वेळेपुर्वी किंवा त्यापुर्वी प्राप्त होतील या बेताने सादर करावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच यामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग राखून ठेवत आहे.

(भा. बा. पाटील)
शासनाचे उप सचिव

मुंबई
दिनांक : २५ सप्टेंबर, २०१८